# जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

जिल्हा न्यायालय, धुळे व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांत खालील यादीप्रमाणे एकुण ११ झेरॉक्स मशीन करीता सर्वसमावेशक (देखभाल, दुरूस्ती, सेवाहमी तसेच संपुर्ण कन्ज्युमेबल्स व पार्टसह) वार्षिक देखभाल करार (AMC) करावयाचा आहे. त्याकरीता इच्छुक कंत्राटदारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन सुचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक २१/०४/२०२५ पासून दिनांक २८/०४/२०२५ पावेतो जिल्हा व सत्र न्यायालय, स्टेशन रोड, धुळे या पत्यावर समक्ष अथवा टपालाद्वारे सिलबंद पाकीटात दरपत्रके मागविण्यात येत आहे. तसेच पाकीटावर आपले कंपनीचे नांव, संपूर्ण पत्ता, दुरध्वनी कमांक, ई-मेल नमूद करावा.

## वार्षिक देखभाल करार करावयाच्या मशीन्सचा तपशील

| अ.क. | आस्थापनेचे नांव | झेरॉक्स मशिन मॉडेल | सीरीयल नंबर |
|---|---|---|---|
| १ | प्रबंधक कक्ष, जिल्हा न्यायालय, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 2421655 |
| २ | अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 2421656 |
| ३ | अभिलेख कक्ष, जिल्हा न्यायालय, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 2421477 |
| ४ | दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 2421442 |
| ५ | मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 2421478 |
| ६ | ३रे सहदिवाणी न्यायालय, क. स्तर, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 2421655 |
| ७ | २रे सहदिवाणी न्यायालय, क. स्तर, धुळे | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 3835341 |
| ८ | दिवाणी न्यायालय क. स्तर, शिरपूर | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 3835059 |
| ९ | दिवाणी न्यायालय क. स्तर, शिंदखेडा | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 3835382 |
| १० | दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 3835338 |
| ११ | दिवाणी न्यायालय क. स्तर, दोंडाईचा | क्योसेरा TASKalfa 3212i | REF 3835429 |

## अटी व शर्ती

१. इच्छुक कंत्राटदारांनी (AMC) च्या दरावर आकारणी करण्यात येणा-या जी.एस.टी. (G.S.T) या कराचा समावेश दरपत्रकामध्ये करावा.

२. कंत्राटदाराने इतर शासकीय आस्थापनांसोबत (AMC) केल्याचे अनुभवाचे दाखले दर पत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. जिल्हा न्यायालय, धुळे व त्या अधिपत्याखालील तालुका न्यायालयांतील एकुण ११ झेरॉक्स मशीन नियमीत सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४. कंत्राटदाराने एकुण ११ झेरॉक्स मशीनची पाहणी त्या त्या न्यायालयांच्या आस्थापनांवर स्वतः जावून करावी व त्याबाबतीत काही शंका असल्यास दिनांक २३/०४/२०२५ पावेतो जिल्हा न्यायालय, धुळे येथे समक्ष उपस्थित राहून सादर करावी. त्यानंतर आपल्या शंकाची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

५. सदरील कंत्राट हा सर्वसमावेशक ( देखभाल, दुरूस्ती, सेवाहमी तसेच संपूर्ण कन्ज्युमेबल्स व पार्टसह ) असल्याने झेरॉक्स मशीन करीता लागणारे टोनर, सुटे भाग व इतर अनुषांगीक बाबी या सर्वस्वी कंत्राटदारास पुरवाव्या लागतील व त्यासाठी कोणताही अतिरीक्त खर्च दिला जाणार नाही.

६. सर्व ११ झेरॉक्स मशीन क्योसेरा या कंपनीचे असुन त्याकरीता लागणारे टोनर, सर्व प्रकारचे सुटे भाग व इतर अनुषांगीक बाबी या कंत्राटदारास क्योसेरा कंपनीच्या ओरीजीनल पुरविणे आवश्यक आहे.

७. अभिलेख कक्ष, धुळे, दिवाणी न्यायालय व स्तर, धुळे, प्रंबधक कार्यालय, धुळे व दिवाणी न्यायालय क. स्तर, शिरपूर या ठिकाणी कामाचा जास्त भार आहे. तेथे अचानक मशीन नादुरूस्त झाल्याने काम ठप्प होवु नये म्हणून **अभिलेख कक्ष, धुळे, येथे २ अतिरीक्त झेरॉक्स मशीन व दिवाणी न्यायालय व स्तर, धुळे, येथे १, प्रबंधक कार्यालय येथे १ व दिवाणी न्यायालय क. स्तर, शिरपूर येथे २ असे एकूण ६ High Speed अतिरिक्त झेरॉक्स मशीनची तजवीज करून ठेवणे आवश्यक आहे.**

८. **म. मुख्य न्यायदंडाधिकारी धुळे व ३रे सह दिवाणी न्यायालय, धुळे, या दोन न्यायालयातील मशीन नादुरुस्त झाल्यास कार्यालयीन कामकाज ठप्प होवु नये म्हणून प्रत्येकी एक असे एकूण २ अतिरिक्त झेरॉक्स मशीनची तजवीज करून ठेवणे आवश्यक आहे.**

९. **कंत्राटदाराने प्रत्येक झेरॉक्स मशीनसाठी म्हणजे कार्यालयाचे तसेच कंत्राटदाराने पुरविलेले अतिरिक्त झेरॉक्स मशीन असे दोन्ही मशीनसाठी अतिरिक्त टोनर प्रत्येक पुरविणे आवश्यक आहे.**

१०. झेरॉक्स मशीनच्या (AMC) करारापोटी कंत्राटदारास सर्व ११ झेरॉक्स मशीनचे एकत्रित देयक मासिक तत्त्वावर जिल्हा न्यायालय, धुळे येथून त्याबाबत नियमानुसार कार्यवाही करून अदा केले जाईल. तसेच देयकातुन नियमाप्रमाणे टी.डी.एस. कपात करण्यात येईल.

११. धुळे जिल्हा न्यायालयातील करार करण्यात आलेले झेरॉक्स मशीन तसेच कंत्राटदाराने पुरविलेले अतिरिक्त झेरॉक्स मशीन असे एकाच कार्यालयात असलेले दोन्ही झेरॉक्स मशीन हे नादुरुस्त असल्यास या कार्यालयामार्फत अथवा संबधीत न्यायालयाने कंत्राटदारास कळविल्या पासुन पुढील ७२ तासांपेक्षा जास्त वेळ बंद राहिल्यास ( कार्यालयाचे सुटटीचे दिवस सोडून ) प्रतिदिन रु.२००/- या दराने दंड आकारण्यात येईल. तसेच सदर दंडाची रक्कम त्या महिन्याच्या देयकातुन वसुल करण्यात येईल.

१२. (AMC) करार करण्यात येणा-या झेरॉक्स मशीन या शासकीय मालकीच्या असुन सदर मशीन्सबाबत कंत्राटदारास कोणताही फेरफार करता येणार नाही ( जसे मशीन्समधील मुळ भागांचे नुकसान, मशीन्सची अदलाबदल व परस्पर विल्हेवाट किंवा विकी ) तसे आढळून आल्यास कंत्राटदाराविरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३. सदर कंत्राटदाराचे काम असमाधानकारक असल्याची जिल्हा न्यायालयाकडे संबंधित आस्थापनेवरून तकार आल्यास त्या तकारीची शहनिशा करून तकारीत तथ्य आढळल्यास कंत्राटदारासोबत करण्यात आलेला करार कोणतीही नोटीस न देता रद्द करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, धुळे यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

१४. सदर कराराच्या बाबतीत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहिल. तसेच दरपत्रक प्रकिया कोणत्याही वेळी कोणत्याही कारणास्तव रदद करण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे यांना राखुन ठेवण्यात आलेले आहे.

१५. दरपत्रक या कार्यालयात सादर करतांना बंद पाकिटावर आपल्या संस्थेचे / कंपनीचे नाव, पुर्ण पत्ता पिनकोडसह, दुरध्वनी कमांक, भ्रमणध्वनीकमांक व ईमेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.

Approved. 19/04/25

19/4/2025
Granted/Approved.

आदेशावरुन,
19/4/25
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे }
दिनांक : /०४/२०२५ }

# दरपत्रकाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | कंपनीचे नाव व पत्ता | |
| २ | कराराचा कालावधी | ०१ वर्षासाठी |
| ३ | कराराचा तपशील | सर्वसमावेशक ( देखभाल, दुरूस्ती, सेवाहमी तसेच संपूर्ण कन्ज्युमेबल्स व पार्टसह ) असल्याने झेरॉक्स मशीन करीता लागणारे टोनर, सुटे भाग व इतर अनुषांगीक बाबी या सर्वस्वी कंत्राटदारास पुरवाव्या लागतील व त्यासाठी कोणताही अतिरीक्त खर्च दिला जाणार नाही. |
| ४ | झेरॉक्स मशीनची एकूण संख्या व कंपनीचे नाव | जिल्हा न्यायालय धुळे अंतर्गत एकूण ११ झेरॉक्स मशीन आहेत. Kyocera Taskalfa 3212i |
| ५ | एका झेरॉक्स प्रतची किंमत | ----- Paise ( Per Copy ) |
| ६ | जी.एस.टी १८ टक्के | ----- Paise ( Per Copy ) |
| ७ | देय असणारी एका झेरॉक्स प्रतची किंमत | ----- Paise ( Per Copy ) |

सही व शिक्का